महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
कार्यकारी अभियंता/ विदयुत/ प्राधिकरण यांचे कार्यालय, खोली क्र. 212, पहिला मजला,
गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे पुर्व, मुंबई-400551
फोन नं. 022-66405441/5498/5031, इ- मेल आय. डी.- eee1mhada@gmail.com

## दरपत्रक सुचना/ कंत्राटदारास दरपत्रकासाठी सुचना

कार्यकारी अभियंता/ विदयुत/ प्राधिकरण, खोली क्र. 212, पहिला मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे पर्व, मुंबई -51 यांच्या कार्यालयामार्फत **प्लॉट क्र. 216 [पी. टी.], 221[पी. टी.], 222[पी. टी.], पेंडकरपाडा व्हिलेज, मिरा-रोड [पुर्व], जि.- ठाणे** खाली नमुद दोन कामांकरीता फक्त सदर कामाचे **दर निश्चित करण्यासाठी** नोंदणीकृत व अशा प्रकारचे काम करण्याचा 3 वर्षाचा अनुभव असणा-या, जी.एस.टी. नोंदणीकृत, ठेकेदार/ कंपनीकडुन उपरोक्त कामाचे **दर** मागविण्यात येत आहे. सदर दरपत्रकामध्ये कामाचा मुळ दर व जी.एस.टी. चा अंतर्भाव करुन कामाच्या बाबींच्या दराचे (शिक्क्यानिशी) मोहरबंद पाकिट दि. **01/04/2021 ते दि.07/04/2021 पर्यंत दुपारी 3.00 वाजेपर्यंत** उपरोक्त कार्यालयामध्ये पोहचतील असे पाठविण्यात यावे. जर शक्य झाले तर सदरची दरपत्रके त्याच दिवशी उघडण्यात येतील.

| अनु.क्र | कामाचे नाव |
|---|---|
| 1 | **256 कि.ग्रा.प्रति दिवस क्षमतेचे अर्ध- स्वयंचलित सेंद्रिय कचरा रुपांतरण मशीन व व त्यास लागणारी सर्वउपकरणे रचना, पुरवठा, उभारणी, चाचणी करणे, कार्यान्वित करणे, तसेच सक्षम प्राधिका-यांकडुन सर्व आवश्यक त्या मंजुरी घेणे ना- हरकत प्रमाणपत्र मिळवणे** व एक वर्षाचा विनामुल्य व पुढील दोन वर्षाकरीता देय असलेल्या रक्कमेसह देखभाल व दुरुस्ती करणे. |
| 2. | 125 के. एल. डी. क्षमतेचा M.B.B.R. प्रकारचा मलनिःस्सारण प्रकल्पाची रचना, **पुरवठा, उभारणी, चाचणी करणे व कार्यान्वित करणे, तसेच सक्षम प्राधिका-यांकडुन सर्व आवश्यक त्या मंजुरी घेणे, ना- हरकत प्रमाणपत्र मिळवणे** व एक वर्षाचा विनामुल्य व पुढील दोन वर्षाकरीता देय असलेल्या रक्कमेसह देखभाल व दुरुस्ती करणे. |

### अटी व शर्ती

1. दरपत्रकावर ठेकेदाराने/ एजन्सीने/ कंपनीचे नाव लिहिणे बंधनकारक राहिल.
2. ठेकेदाराने/ एजन्सीने/ कंपनीने दरपत्रकारबरोबर मागच्या 3 वर्षांत केलेल्या समान प्रकारच्या कामाचा तपशील व कामाचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
3. ठेकेदाराने/ एजन्सीने/ कंपनीने दरपत्रकारबरोबर कमीत कमी 3 वर्षाचा अनुभव प्रमाणपत्र जोडणे व जी. एस. टी. क्रमांक जोडणे अनिवार्य राहिल.
4. ठेकेदाराने/ एजन्सीने/ कंपनीने काम पुर्ण झाल्यानंतर एक वर्षाचा विनामुल्य देखभाल करण्यासाठी लागणा-या खर्चाची रक्कम रदपत्रकात समाविष्ठ करावी.
5. ठेकेदाराने/ एजन्सीने/ कंपनीने दरपत्रक कामाचे मुळ दर, वार्षिक देखभाल व दुरुस्तीचे दर जी. एस. टी. वगळुन, व जी.एस. टी. ची रक्कम स्वतंत्ररित्या भरावेत.
6. ठेकेदाराने/ एजन्सीने/ कंपनीने दरपत्रक पुर्णपणे भरलेले व कंपणीच्या/ एजन्सीच्या सही व शिक्क्यानिशी मोहरबंद लिफाफ्यामध्ये सादर करावे.

7. दरपत्रक स्विकारणे, रद्द करणे याबाबत कार्यकारी अभियंता/ विदयुत/ प्राधिकरण यांना पुर्ण अधिकार राहतील.
8. सदरचे दरपत्रक फक्त उपरोक्त कामाचे दर निश्चित करण्यासाठी मागविण्यात येत आहेत. तरी कार्यादेशाचा दावा करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

कार्यकारी अभियंता/ विदयुत/
प्राधिकरण

y:\shwetali old pc backup\kokan electrical (final folder)\mig _mira road\owc paper notice\marathi notice owc.docx